# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २२८/२०२४ दिनांक-१९/०६/२०२४

## बँक खात्याचे केवायसी अपटेड करावयाचे सांगुन ऑनलाईन फसवणूक झालेली ९९,८००/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्रीमती. जान यांनी **त्यांची बँकेचे केवायसी अपटेड करण्याचे सांगुन ९९,८००/- रु ची आर्थिक फसवणुक** झाल्याबाबत तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आला होता.

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन करुन रक्कमेचे पुढिल व्यवहाराची माहिती प्राप्त करण्यात आली. तक्रारदार यांची रक्कम वळती झालेल्या संशयीत खात्याची माहिती प्राप्त करुन खाते तात्काळ गोठवुन रक्कम तक्रारदार यांचे खात्यात रक्कम वर्ग होणेकरीता संबंधीतांना पत्रव्यवहार करण्यात आला होता. संशयीत खात्यात गोठविलेली रक्कम तक्रारदार यांचे रक्कम त्यांचे मुळ खात्यात मिळविण्याकरीता मा. न्यायालयात पाठपुरावा करुन **फसवणुक झालेली ९९,८००/- रक्कम त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी मोबाईल धारकांना आपली वैयक्तिक माहिती/ आर्थिक व्यवहारासंबंधीत माहिती उघड करु नये. आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/प्रसाद शेनोळकर, मपोहवा/माधुरी धिंडे, मपोअं/सुवर्णा माळी, मपोअं/पल्लवी निकम, पोअं/शुभम कांबळे, पोअं/राहुल बन यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५.
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----